
# महिलांचा सन्मान भारतीय संविधान




## संविधान जागर अभियान

## संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:

(मा. न्या. बी. जी. कोळसे पाटील, मा. न्या. अभय ठिपसे, मा. न्या. तानाजी नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन)

**संपर्क पत्ता:** 24, गार्डन लेआऊट, बेझनबाग, नागपूर, महाराष्ट्र – 440 014

**मुद्रक:** आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030

samvidhanjagar.org

samvidhan.jagar

स्वप्निल फुसे: 79723 45764

डॉ. श्याम मुडे: 94047 08852

श्रद्धा रेखा राजेंद्र: 92704 78335

राजाभाऊ करवाडे: 98222 02739

सामाजिक विषयांवर माहिती मिळवण्यासाठी व्हॉट्सअप क्यूआर कोडला स्कॅन करा!

**सहयोग मूल्य ₹ 15/-**

या पुस्तिकेचे कसलेही कॉपीराईट नाही

# संविधानापूर्वी स्त्रियांची स्थिती

## सतीप्रथा व केशवपन; पुनर्विवाहावर बंदी

## मुलींना शिकण्याचा अधिकार नव्हता

**बालविवाह:**
पाळण्यात असतानाच मुलींची लग्नं लावली जात.

राजे, संस्थानिकांना **अनेक विवाह व पत्नी–उपपत्नी** ठेवण्याची मुभा होती.



केरळमध्ये अस्पृश्य स्त्रियांना उरोभाग झाकण्यासाठी **‘स्तन कर’** भरावा लागत असे.

**डोला प्रथा:**
दलित-मागासवर्गीय नवविवाहित स्त्रियांना लग्नाच्या पहिल्या रात्री जमीनदाराकडे पाठवले जात असे.

**संविधानापूर्वी स्त्रियांना माणूस म्हणून मान्यता नव्हती!**

# संत कवयित्रींचा मुक्तीचा आत्मस्वर



**स्त्री एन्दरे कामि एन्नबेडे, पुरुष एन्दरे कामी एन्नबेडे. मनसु मथु भाव शुद्धवागिद्दरे, अवने शिव, अवळे शक्ति. चेन्नमल्लिकार्जुन ।**

(स्त्रीला आणि पुरुषालाही 'कामी' (वासनांध) म्हणू नका. जर मन आणि भाव शुद्ध असतील, तर तो 'शिव' आहे आणि ती 'शक्ती' आहे. हे चन्नमल्लिकार्जुना!)

**- अक्का महादेवी**



**डोईचा पदर आला खांद्यावरी ।**
**भरल्या बाजारी जाईन मी ॥**
**हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।**
**आता मज मना कोण करी ॥**

**- संत जनाबाई**

**लीळा: महदंबांनी विचारले,"जी जी, स्त्रियांतें ज्ञान होय कीं?"** (स्वामी, स्त्रियांना ज्ञान प्राप्त होऊ शकते का?)

**चक्रधर स्वामींचे उत्तर: "का न होय? येथे स्त्री पुरुष पाड नाही : जो अनुसरे तोचि थोर :"**
(येथे स्त्री-पुरुष भेद नाही; जो योग्य आचरण करतो, तोच श्रेष्ठ)

**- संत महदंबा (लीळाचरित्र)**



# संत कवयित्रींचा मुक्तीचा आत्मस्वर

**देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुध्दबुध्द ॥**
**देहिचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ॥**
**विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान ।**
**कोण देह निर्माण नाही जगी ॥**

**- संत सोयराबाई**



**मी सद्गुरूची लेक । भाव एक ॥**
**बाई मी नि:संग धांगडी ।**
**फेकिली प्रपंच लुगडी ॥**
**नाकी नाही नथकडी ।**
**माझे नाव म्हणती आवडी ॥**

**- संत मुक्ताबाई**

(संसारातील खोट्या सुखाचा (लुगडी, नथ) त्याग करून मुक्ताबाई आपल्या गुरुंच्या ज्ञानाने परमात्म्याशी एकरूप झाल्या आहेत.)

**अमि पनुन पन न कंह रोज़ान बंद**
(मी स्वत:मध्येच पूर्ण आहे;
मला कोणत्याही बंधनात बांधता येत नाही.)

**- संत लाल देद** (काश्मिरी संत-कवयित्री)



# शूर व न्यायप्रिय राज्यकर्त्या



**राजमाता जिजाऊंनी** सतीप्रथा नाकारली. स्त्रियांना अधिकार नाकारले गेले असतानाही न्यायनिवाडा केला व राज्यकारभाराची परंपरा निर्माण केली.



पेशवाई नाकारून कोल्हापूरचे स्वतंत्र संस्थान उभारण्याचे धाडस **रणरागिणी ताराबाईंनी** केले.



विधवा असुनही **अहिल्याबाई होळकरांनी** संस्थानाचा कारभार आदर्शपणे चालवून स्त्रियांची क्षमता सिद्ध केली.



बलाढ्य मुघल सैन्याचा कडवा प्रतिकार करत आत्मबलिदान देणारी गोंडवानाची वीरांगना – **राणी दुर्गावती**



भारतातील पहिली व एकमेव मुस्लिम महिला शासक – **रझिया सुलताना**. शौर्य व प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर राज्यकारभार केला.

# शिव-फुले-शाहू यांचा स्त्रीमुक्ती विचार



**शिवरायांनी** आया-बहिणींची काळजी घेतली.

सैन्याला दिलेल्या आज्ञा

“मोहिमेस जाताना कुणीही बटकिणी-
कुणबीणी अगर कलावंतिणीस
बरोबर घेऊ नये”

“कुणाही शत्रू स्त्रीस बटकीण
बनविता कामा नये”

**महात्मा फुलेंनी** मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाचा पाया घातला. अनाथ व विधवा महिलांना आधार देण्यासाठी महाराष्ट्रातील पहिले ‘बालहत्या प्रतिबंधक गृह’ स्थापन केले. बालविवाह, सतीप्रथा आणि स्त्रियांच्या दमनकारी रूढींविरुद्ध आवाज उठवला.





**राजर्षी शाहू महाराज** यांनी महिलांसाठी स्वतंत्र शाळा व वसतिगृहे सुरू केली. विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली, घटस्फोटाचा अधिकार दिला आणि बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न केले.

# स्त्री मुक्तीचा पाया रचला



स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या **सावित्रीबाई फुले** व त्यांच्या सहयोगी **फातिमा शेख**, बालविवाह व सक्तीच्या वैधव्याविरोधात संघर्ष करणाऱ्या **पंडिता रमाबाई**, स्त्रीविरोधी सामाजिक रचनेचे सखोल विश्लेषण करणाऱ्या **ताराबाई शिंदे**, स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांसाठी लढणाऱ्या **रमाबाई रानडे** आणि वैद्यकीय पदवी मिळवणारी पहिली भारतीय महिला डॉक्टर **आनंदीबाई जोशी**, दलित महिलांमध्ये चेतना भरणाऱ्या **रमाबाई आंबेडकर** – अशा स्त्रियांनी आपल्या कार्यातून स्त्री मुक्तीचा पाया रचला आणि समाज परिवर्तनाची दिशा ठरवली.

# 1857: पहिल्या स्वातंत्र्य संग्रामात असंख्य स्त्रियांचा सहभाग!



## झाशीची राणी लक्ष्मीबाई

ब्रिटिश त्यांच्याबद्दल म्हणाले,
“ती बंडखोर नेत्यांमध्ये सर्वात
धाडसी आणि शूर होती.”

## झलकारीबाई

झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या निकट धाडसी सहकारी, त्यांच्या शौर्यामुळे राणीला सुरक्षितपणे रणांगणातून बाहेर पडता आले.





## बेगम हज़रत महल


1857 च्या अवधमधील लढ्याचे धैर्याने नेतृत्व

## उदा देवी



लखनऊ येथील सिकंदर बागेच्या लढाईत झाडावरून ब्रिटिश सैनिकांवर गोळीबार करणारी दलित महिला योद्धा. अखेरीस शहीद झाली.

# स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेतेः गांधी-आंबेडकर



स्त्रीचे सौंदर्य दागिन्यात नसून तिच्या सुदृढ प्रकृतीत, करारी चेहऱ्यावर व कर्तव्यनिष्ठेत आहे.

- महात्मा गांधी



एखाद्या समाजाची प्रगती मी त्या समाजातील स्त्रियांनी किती प्रगती केली आहे यावरून मोजतो.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेतेः नेहरू-आझाद



समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रियांचे शिक्षण आणि मुक्ती आवश्यक आहे.

**- पं. नेहरू**



स्त्री सशक्तीकरण केवळ परिवार किंवा समाजासाठी नाही; ती राष्ट्राच्या भविष्याची हमी आहे.

**- मौलाना आझाद**

**स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनी सामाजिक आणि राजकीय जीवनात महिलांच्या सक्रिय सहभागाचे जोरदार समर्थन केले.**

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यात असंख्य स्त्रियांचा सहभाग!

## उषा मेहता

काँग्रेसच्या गुप्त रेडिओ द्वारे चळवळ देशभर पसरवण्यात मोलाचे योगदान दिले.





## अबादी बानो बेगम

हिंदू-मुस्लिम ऐक्य, खादी, स्वदेशी व तिलक स्वराज निधीसाठी जनजागृती केली.



## लक्ष्मी सहगल


आझाद हिंद फौजेची ‘राणी झाशी रेजिमेंट’ जगातील पहिल्या महिला रेजिमेंटपैकी एक, 1500 शस्त्रसज्ज स्त्रिया

# 1942: ‘भारत छोडो’ आंदोलनाचे नेतृत्व स्त्रियांनी केले



काँग्रेसच्या सर्व नेत्यांच्या अटकेनंतर स्त्रियांनी चळवळीची जबाबदारी स्वीकारली – प्रचंड धरणे, संप, सभा घेतल्या, कायदे मोडले.

सुचेता कृपलानी, उषा मेहता, मृणाल गोरे, सुशीला गुप्ते, तारा रेड्डी यांसारख्या असंख्य स्त्रियांनी 1942 च्या लढ्यात महत्त्वपूर्ण नेतृत्व केले. त्याग, धैर्य आणि संघर्षाचे नवे मानदंड घडवत, त्या भूमिगत कार्यापासून बलिदानापर्यंत प्रत्येक स्तरावर अग्रणी होत्या.


1942 ‘भारत छोडो’ आंदोलनात
स्त्रियांचे अपूर्व शौर्य
अरुणा असफ अलींनी
गोवालिया टँकवर झेंडा
फडकावला.
ब्रिटिश सरकारने त्यांना
पकडण्यासाठी
₹5,000 बक्षीस
जाहीर केले होते.
छातीवर गोळ्या झेलत
मातंगिनी हजरा शहीद झाल्या.

# संविधान निर्मितीमध्ये महिलांचा ऐतिहासिक सहभाग

संविधान निर्मितीमध्ये 15 महिलांचा सहभाग होता.
स्त्रियांसंबंधी धोरणे, समानतेचे तत्व आणि
मूलभूत अधिकार ठरवण्यात त्यांनी
अत्यंत मोलाची भूमिका बजावली.



त्यांच्या कर्तृत्वामुळे
स्वतंत्र भारतात पहिले
राष्ट्रगीत गाण्याचा,
राष्ट्रध्वज राष्ट्राला अर्पण
करण्याचा बहुमान
महिलांना मिळाला.

हंसा मेहता यांची
संविधानावरची सही म्हणजे
स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांच्या
योगदानावर उमटलेली
सुवर्णमुद्रा होय.



# संविधान सभेतील 15 महिला


सरोजिनी नायडू


दुर्गाबाई देशमुख


हंसा मेहता


बेगम ऐज़ाज़ रसूल


दाक्षायनी वेलायुधन


अमृत कौर


एनी मास्कारेन


सुचेता कृपलानी


पूर्णिमा बॅनर्जी


कमला चौधरी


लीला रॉय


रेणुका रे


मालती चौधरी


विजयालक्ष्मी पंडित


अम्मु स्वामीनाथन

# संविधानाने दिला स्त्रियांना मताधिकार




**अमेरिकेतसुद्धा प्रौढ स्त्रियांना स्वातंत्र्यानंतर तब्बल 144 वर्षांनी, तर आदिवासी व कृष्णवर्णीयांना 180 वर्षांनी मतदानाचा हक्क दिला.**

**पाश्चिमात्य देशांमध्ये स्त्रियांनी मतदानाच्या अधिकारासाठी संघर्ष केला व मोठ्या चळवळी उभ्या केल्या.**

**भारत हा जगातील पहिला देश आहे, ज्याने स्वातंत्र्य मिळताच सर्व प्रौढ स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला.**

# स्वतंत्र भारतातली पहिली मतदार यादी तयार होत असताना...

1951-52 मध्ये पहिल्या मतदार याद्या तयार करण्यात आल्या. रस्ते, प्रवासाची साधने नसतानाही निवडणूक कर्मचारी देशाच्या अतिदुर्गम भागांत गेले – लोकांना मतदानाचा हक्क सांगण्यासाठी आणि त्यांची मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी.



**अनेक स्त्रियांनी नाव नोंदवण्यास नकार दिला. या सर्व स्त्रियांना लोकशाहीत सहभागी करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.**

महिला काँग्रेसने संपूर्ण वर्षभर चालवलेल्या मोहिमेनंतर कोट्यवधी महिलांनी आपली नावे मतदार यादीत नोंदवली. पडदा/घुंघट घेणाऱ्या महिलांच्या नाव नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

# स्वतंत्र भारतात महिलेची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात आली!

पहिली मतदार यादी तयार होत असताना
अनेक स्त्रियांनी स्वतःचे नाव नोंदवताना
'अमक्याची पत्नी'/'तमक्याची मुलगी' असे लिहिले.

**निवडणूक आयोगाचा स्पष्ट आदेश:**
**"प्रत्येक महिलेची स्वतंत्र नोंद अनिवार्य"**




**पं. नेहरू व डॉ. आंबेडकरांची स्पष्ट भूमिका:**
**स्त्रियांना स्वतंत्र नागरिक म्हणून मान्यता मिळालीच पाहिजे**

**त्यामुळेच आज मतदानात महिलांची भूमिका पुरुषांपेक्षा अधिक निर्णायक झाली आहे.**
**नाहीतर स्त्रियांकडे कुणी लक्षही दिले नसते.**

# शिक्षणाचा अधिकार



संविधानाने महिलांच्या शिक्षणाचा कायदेशीर अधिकार मान्य केला. या अधिकारामुळे **‘गाव तिथे शाळा’** आली व गरीबांच्या मुली शिकू लागल्या.

**कलम 21(अ):** 6–14 वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण

**कलम 15(3):** महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार – मोफत पुस्तके, गणवेश, बस पास इ.



देशाच्या स्वातंत्र्यानंतर अवघ्या दोन दशकांत शाळा व विद्यार्थी संख्या झपाट्याने वाढली; त्यात मुलींची संख्या मुलांपेक्षा अधिक होती.

# संविधानाने स्त्री-पुरुष समानतेची हमी दिली!



## कलम 14: कायद्यापुढे समानता

प्रत्येक नागरिकाला कायद्यापुढे समान दर्जा व संरक्षण

## कलम 15: भेदभावावर बंदी

धर्म, लिंग, वंश, जात, जन्मस्थान किंवा उत्पत्तीच्या आधारावर भेदभाव निषिद्ध; स्त्रियांसाठी विशेष तरतुदींना परवानगी – मातृत्व लाभ, आरक्षण व सक्षमीकरणाचे इतर उपाय

## कलम 16 : रोजगार व पदोन्नतीतील समानता

सरकारी नोकऱ्या व पदोन्नतीमध्ये लिंग, जात किंवा धर्माच्या आधारावर भेदभाव निषिद्ध

# संविधानाने स्त्री-पुरुष समानतेची हमी दिली!



## कलम 21: स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार

- **संमतीचा अधिकार:** स्त्रीच्या शरीरावर किंवा आयुष्यावर संपूर्ण तिचाच हक्क
- स्वतःच्या इच्छेने विवाह करण्याचे स्वातंत्र्य आणि जबरदस्तीच्या विवाहास नकार देण्याचा अधिकार
- लैंगिक हिंसाचार व घरगुती हिंसाचारापासून संरक्षणाचा अधिकार
- लैंगिक गोपनीयतेचा अधिकार
- प्रजननाविषयी निर्णय घेण्याचा अधिकार



# रोजगाराचा अधिकार

## कलम 39(ड): समान कामाला, समान दाम

**संविधानाने महिलांना घराबाहेर पडून काम करण्याचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा अधिकार दिला.**

‘चूल-मूल’ या चौकटीपलीकडे जाऊन **समान, योग्य व न्याय्य मोबदला मिळवण्याचा अधिकार दिला.**



**कलम 39(अ): स्त्री-पुरुष दोघांनाही उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान हक्क**

# संविधानातील सामाजिक न्यायाच्या तरतूदी

## संविधान केवळ अधिकार देत नाही, तर त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम यंत्रणाही निर्माण करते.

**गर्भवती स्त्रियांना:**

- संघटित क्षेत्रात **26 आठवड्यांची प्रसूती रजा**
- पोषण आणि आरोग्याच्या काळजीसाठी – **अंगणवाडी सेविका** व **आशा वर्कर्स**
- मातृ वंदना योजने अंतर्गत **6,000 रुपयांची मदत**



# संविधानामुळे महिलांना संपत्ती व वारसाहक्क

संविधानापूर्वी महिलांना घर, जमीन किंवा मालमत्ता स्वतःच्या नावावर ठेवण्याचा हक्क नव्हता.

**आज महिलांना घर-जमीन मालकीचा अधिकार आहे. आज सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव नोंदवले जाते.**



**हिंदू वारसाहक्क कायदे (1956 व 2005)**
**महिलांना वडिलांच्या व पतीच्या संपत्तीत समान हक्क – हा अधिकार संविधानातील समानतेच्या तत्वांवर आधारित आहे.**

# बालविवाह बंदी, घटस्फोट व पुनर्विवाह अधिकार

## संविधानामुळे स्त्रियांना

**लग्नाचे किमान वय 18 वर्षे**




**पुनर्विवाहाचा अधिकार**



**घटस्फोट घेण्याचा अधिकार**

**पोटगीचा अधिकार**

**कलम 51अ(ई)**

सतिप्रथा, देवदासी प्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह प्रथा इ. सारख्या स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे नागरिकांचं कर्तव्य आहे!

# संविधानामुळे महिलांची नवी ओळख

**आज महिला डॉक्टर, इंजिनियर, वकील, इन्स्पेक्टर, एसीपी, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, पंतप्रधान आणि राष्ट्रपती म्हणून ओळखल्या जातात.**

**जगातील सर्वात जुनी लोकशाही असलेल्या अमेरिकेत आजपर्यंत महिला राष्ट्राध्यक्ष झाली नाही.**



**पण स्वतंत्र भारतात 18 वर्षांतच इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या.**

**हे संविधानामुळेच शक्य झाले आहे !**

**हक्कांचे व अधिकारांचे संरक्षण केवळ कायद्यामुळे होत नाही; ते समाजाच्या सामाजिक आणि नैतिक जाणीवेमुळेच सुनिश्चित होते.**

**- डॉ. आंबेडकर**

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक चळवळी उभ्या केल्या.




**या संघर्षांमुळे स्त्रियांची सामाजिक-राजकीय चेतना वाढली.**

**संविधानातील अधिकार अंमलात आणण्यासाठी नवे कायदे झाले. महिलांच्या चळवळीच्या दबावाखाली न्यायालयांनीही समानतेच्या अधिकाराचा अर्थ विस्तारला.**

# स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी कायदे




- **हुंडाबंदी कायदा, 1961**
- **घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा, 2005:** शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक हिंसाचाराविरुद्ध संरक्षण
- **POCSO कायदा, 2012:** 18 वर्षांखालील मुलींवरील लैंगिक अत्याचाराविरुद्ध संरक्षण
- **कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा 2013** (POSH)
- **बलात्कारविरोधी तरतुदी:** BNS कलम 63 ते 71
- **ॲसिड हल्ला प्रतिबंध:** BNS कलम 124 व 125
- **अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा** (ITPA)

# स्त्रियांच्या प्रतिनिधित्वासाठी आरक्षणाचा अधिकार आवश्यक

## कलम 243(ड) व 243(ट)




स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी किमान 33% जागा आरक्षित

महाराष्ट्रासह भारतातील 21 राज्यांनी हे आरक्षण 50 टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांचा समावेश असून जागांची आवर्तन पद्धत लागू आहे.



लोकसभा आणि विधानसभेत 33% आरक्षण कायदा लवकर लागू व्हावा यासाठी जोरदार मागणी केली जात आहे.

# मात्र समानता अजूनही लांबचा पल्ला



**समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे आज देशात,**

राजकारणात स्त्रियांचे प्रमाण:
**केवळ 14%**

अजून कोणतीही
**महिला सरन्यायाधीश नाही.**

NFHS-5 सर्वे: **50% महिला ॲनिमिक**

**दर 72 सेकंदाला**
एका महिलेवर अत्याचार होतो.

आजही स्त्रियांसाठी स्वच्छ, सुरक्षित व
**पुरेशी स्वच्छतागृहे नाहीत.**

स्त्रियांच्या आरोग्यासाठी व
सुरक्षिततेसाठी **पुरेसे बजेट नाही.**

घराच्या बाहेर काम करणाऱ्या स्त्रियांचा
रोजगार सहभाग दर: **अत्यंत कमी 17%**

# चला, महिलांच्या सन्मानासाठी संविधानाचा जागर करूया!



समानता, स्वातंत्र्य व सन्मान ही केवळ संविधानातील शब्द नसून स्त्रीच्या जगण्याची मूलभूत तत्त्वे आहेत. संविधानाने महिलांना अधिकार दिले, पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव तेव्हाच येईल, जेव्हा समाज म्हणून आपण ते अधिकार मान्य करू, पाळू आणि संरक्षण करू. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, स्त्रीच्या निर्णय स्वातंत्र्याचा सन्मान करणे व समानतेसाठी संघटित होणे – **हेच संविधानाच्या मूल्यांचे प्रत्यक्ष पालन आहे.**